भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक ०६.०६.२०२० ते १०.०६.२०२०)

| अंक ४४@२०२० | दिनांक ०५.०६.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२९/०५/२०२० ते ०४/०६/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता ०६/०६/२०२० ते १०/०६/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९/०५ | ३०/०५ | ३१/०५ | ०१/०६ | ०२/०६ | ०३/०६ | ०४/०६ | दिनांक | ०६/०६ | ०७/०६ | ०८/०६ | ०९/०६ | १०/०६ |
| ०.० | ०.० | ०.० | २९.४ | ९.२ | ६६.४ | ५४.६ | पाऊस (मि. मी) | १० | १२ | १२ | २ | १२ |
| ३७.० | ३९.० | ३९.० | ३९.० | ३९.५ | २८.० | ३१.५ | कमाल तापमान (अं. से) | ३४ | ३४ | ३४ | ३४ | ३४ |
| २५.० | २५.० | २५.० | २५.० | २४.० | २४.० | २६.० | किमान तापमान (अं. से) | २३ | २३ | २३ | २३ | २३ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | ४ | ३ | १ | २ | ३ |
| निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८० | ८० | ७५ | ८६ | ८४ | ९७ | ९२ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ९२ | ९० | ९१ | ८९ | ८९ |
| ४८ | ४८ | ४८ | ७१ | ७५ | ८९ | ७२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६५ | ६३ | ५८ | ५८ |
| २.३ | २.४ | २.० | १.८ | १.९ | ६.५ | २.६ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ७ | ७ | ६ | ५ | ४ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | उत्तरोत्तर/ वायव्य | पश्चिमोत्तर/ वायव्य | सकाळ – वा-याची दिशा | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणे कडे |
| पश्चिमोत्तर/ वायव्य | पश्चिमोत्तर/ वायव्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर/ वायव्य | पश्चिमोत्तर / वायव्य | पश्चिमोत्तर/ वायव्य | उत्तरोत्तर/ ईशान्य | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | १५९.६ | १५९.६ | १५९.६ |

| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती: | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे, त्याचबरोबर दिनांक ६ ते १० जून २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी माध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व मुख्यत्वे निरभ्र राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे. |
|---|---|

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, नागली व वरी | रोपवाटीका व्यवस्थापन व पेरणी | निसर्ग या चक्रीवादळामुळे बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस झाला आहे व ज्या ठिकाणी भात पिकाची पेरणी झाली होती व रोपे उगवून आली आहेत अश्या ठिकाणी चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल.<br>या आठवड्यात मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने खरिप पीकांच्या पेरणीस सुरुवात करावी. भातासाठी रोपवाटिका तयार करावयाच्या क्षेत्रामध्ये प्रती गुंठा १ किलो युरिया, ३ किलो सिंगल सुपर फॉस्फेट व चांगले कुजलेले शेणखत द्यावे. बियाण्यास प्रती २ ग्रम याप्रमाणे थायरम किंवा इमिसान हे औषध चोळावे. वाफ्यावर पेरणी करताना ७ ते ८ सेमी अंतरावर ओळीमध्ये साधारण २ सेमी खोलीवर बी पेरावे आणि ते झाकुन घ्यावे. जाड दाण्याच्या जातीकरीता ४० किलो तर संकरीत जातीकरीता २० किलो बियाणे वापरावे. नागली आणि वरी पीकांची पेरणी देखील भाताप्रमाणे करावी व बियाणे विरळ पेरावे त्यामुळे रोपे जोमदार होतील.<br>ज्या ठिकाणी गादि वाफे करणे शक्य नसेल तर रोपे तयार करण्यासाठी शेतातील उंचवठ्याची जागा निवडावी. व चारही बाजुंनी खोल चारी काढावी यामुळे पाऊस जास्त झाला तरी पाण्याचा निचरा होण्यास मदत होईल व कोवळी रोपे मरण्याचे प्रमाण कमी राहिल. |
| भुईमुग | पुर्व मशागत व पेरणी | जमिन मध्यम ते भारी आणि चांगला निचरा होणारी निवडावी. जमिन खोल नांगरुन भुसभुशित करावी. शेवटच्या कुळवणीपुर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट मातीत मिसळुन घ्यावे.<br>खरीप हंगामातील भुईमुगाची पेरणी १० ते २० जुन पर्यंत करावी. येत्या आठवड्यात मध्यम पाऊस पडण्याची शक्यता असल्याने भुईमुगाच्या पेरणीची पुर्व तयारी करावी. |
| आंबा | काढणी व नवीन लागवड | निसर्ग या चक्रीवादळामुळे बऱ्याच ठिकाणी मुसळधार पाऊस झाला असल्याने व हवेतील आर्द्रतेचे प्रमाण वाढले असल्यामुळे आंबा पिकावरील नवीन पालवीवर करपा व भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे व प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी थायोफिनेट मिथिल व कार्बेन्डाझीम १% १ ग्रम प्रती १ लिटर पाण्यातुन फवारावे.<br>चक्रीवादळ येण्यापूर्वी व सध्या परिस्थितीत काढणी केलेल्या आंबा फळास आर्द्र वातावरणामुळे फळकूज या रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो, प्रादुर्भाव टाळण्यासाठी व हापुस आंब्याच्या काढणी पश्चात फळकुज रोगाचे प्रभावी नियंत्रण करण्यसाठी फळे पोटॅशिअम मेटाबायसल्फाईट (०.०५%) या रसायनाच्या ५० अंश सेल्सीअस उष्णजल द्रावणात १० मिनिटे बुडवून नंतर पिकत ठेवावीत.<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>आंबा बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| काजु | नवीन लागवड | चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे, मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व त्या ठिकाणी बोर्डो पेस्ट लावण्याची व्यवस्था करावी<br>चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी काजू बागेतील झाडांचे फांद्या मोडून नुकसान झाले आहे अश्या मोडलेल्या फांद्या काढून घ्याव्यात व जखम झालेल्या ठिकाणी रोठा या किडीचा प्रादुर्भाव होऊ शकतो प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादुर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| नारळ | नवीन लागवड | चक्रीवादळामुळे वाऱ्याचा वेग जास्त होता त्यामुळे समुद्र किनाऱ्याकडे भागात बऱ्याच ठिकाणी नवीन लागवड केलेली रोपे पडली असल्यास त्यास काठीने आधार द्यावा<br>नारळ व सुपारीच्या बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करावा |
| भाजीपाला | पेरणी/लागवड | शेतातील पाण्याचा निचरा झाला असल्यास व जमीन वापश्याच्या स्थितीत असताना भाजीपाला पीकांमध्ये मिरची, वांगी, टोमॅटो, भेंडी, काकडी, कारली, पडवळ, चिबुड, शिराळी ई. पीकांची पेरणी/लागवड करावी लागवड करण्यास योग्य हवामान असून पाऊसाचा अंदाज पाहून पेरणी करावी. तसेच पेरणीसाठी सुधारीत जातीचे बियाणे वापरावे. भेंडीची लागवड सरी-वरंब्यावर करावी. वेलवर्गीय भाजीपाला पीकांसाठी मातीचे ऊंचवटे करुन त्यावर मध्यभागी लागवड करावी. |
| कुक्कुटपालन | | कोंबड्यांना रानीखेत रोगापासुन संरक्षण करण्यासाठी पशुवैद्यकांच्या मार्गदर्शनाखाली लसीकरण करुन घ्यावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशीक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|